# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - ०४ / २०१८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ३० / १० /२०१८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (ड) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०४, शुक्रवार दिनांक ०२ / ११ /२०१८.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( ड ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **शुक्रवार दिनांक ०२ /११/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक - ४ शुक्रवार दिनांक ०२ / ११ / २०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता **अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे होणा-या **विशेष सभेची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १३ | स्वच्छ महाराष्ट्र अभियाना (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१९ कामी अहमदनगर शहर कचरा मुक्त शहर तारांकित मानांकन बाबत मा. शासनास कळविणेकामी मा. महासभेची मंजुरी घेणेकामी प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत. |
| १४ | महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजूरी मिळणे बाबत |
| १५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव कार्यालयाजवळील चाहुराणा बु. ४६/१ पैकी मोकळी जागा श्री संत सावता आश्रम शिक्षण समिती, माळीवाडा या संस्थेस शैक्षणिक वापरासाठी भाडे तत्वावर जागा देणे बाबत.. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिकेमधील कायम पात्र कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदाना बाबत... |
| १७ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ३० / १० /२०१८.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १३** **दिनांक : ०२ / ११ /२०१८.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :- स्वच्छ महाराष्ट्र अभियाना (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१९ कामी अहमदनगर शहर कचरा मुक्त शहर तारांकित मानांकन बाबत मा.शासनास कळविणेकामी मा.महासभेची मंजुरी घेणेकामी प्रस्तावास मंजुरी मिळणे बाबत...**

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भः-** १) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन परिपत्रक,क्रमांक:स्वमअ-२०१८/प्र.क्र.८२/ नवि-३४,हुतात्मा राजगुरु चौक,मादामकामा मार्ग ४ था मजला,मंत्राल्य,मुबई दिनांक २ जुन २०१८ रोजीचे शासन निर्णय नुसार.

२) मा.आयुक्त साहेब यांची दि.२९/१०/२०१८ रोजीच्या मंजुरीनुसार.

उपरोक्त विषयाकींत संदर्भीय प्रस्तावना सादर करण्यात येते की,स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)अतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१९ अहमदनगर महानगरपालिकेचे काम चालु आहे.त्यानुषंगाने संदर्भीय शासन निर्णय निर्णयनुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत शहरे हागणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थापनातंर्गत स्वच्छ करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे.

या अभियानांतर्गत अहमदनगर शहर हे हागणदारी मुक्त मा.शासनामार्फत सर्वे टिमच्या सर्वेक्षण नुसार घोषित झालेले आहे.त्याच प्रमाणे ओडीफ प्लस बाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

संदर्भीय मा.शासन निर्णयानुसार शहरांना कचरा मुक्त होण्याकरिता एकुणच स्वच्छतेमध्ये क्रमाक्रमाने आणखी सुधारणा होण्याच्या दृष्टीने शहरांना तारांकित मानांकन(Star Rating) देण्याबाबत शासनाची तयारी आहे.

त्यानुषंगाने प्राप्त मा.शासन निर्णयामध्ये मार्गदर्शन सुचना दिलेल्या आहेत.त्यानुसार मनपा सदस्यांकडून संबंधित प्रभागाचे कचरा मुक्त तारांकीत मानांकनाबाबत घोषणापत्र घेणे आवश्यक आहे.त्यानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाने मा.मनपा सदस्य यांचेकडुन पत्र प्राप्त केलेले आहे. त्यानुसार आपल्या मनपा मार्फत शहरातुन दैनंदीन अंदाजे ९५% कचरा संकलन करुन तो कचरा साठवणुक केंद्रापर्यंत वाहतुक करण्यात येवुन त्यावर प्रक्रिया केली जाते व कचरा संकलन करतांना वर्गीकरण सहीत कचरा अंदाजे ५५% संकलीत केले जाते त्यानुसार दैनंदीन घरोघरी कचरा संकलन व वाहतुकीचे प्रमाणे ९५ % असल्याने आपल्या महानगरपालिकेस मानांकनातील सुचनेनुसार दुसऱ्या क्रमांकचे मानांकन मिळणे कामी मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे व ओडीएफ प्लस बाबत मा.महासभेची मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

त्याकरीता मनपा सदस्य यांचेकडील पत्र प्राप्त असुन मा.शासन निर्णयानुसार सदर विषय मा.महासभेची मंजुरी घेवुन शासनाकडे प्रस्ताव पाठविणे उचित राहील.

सबब वरीलप्रमाणे मा.महासभेपुढे मंजुरीकामी प्रस्ताव सादर करणेस मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर मा.मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचा अभिप्राय की, स्वच्छ सर्वेक्षण कक्ष प्रमुख यांचे अहवालानुसार पु.त.साठी सादर.

यावर मा.उपायुक्त यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर मॅडम यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :-** **१४** **दिनांक : ०२ /११/२०१८.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिकेच्या माध्यमिक विद्यालयामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजूरी मिळणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** १) मा.महासभा ठराव क्र.०४ दिनांक २५/०६/२००८

२) मा.स्थायी समिती ठराव क्रं.५९ दिनांक २६/०९/२०१७.

३) मा.महासभा ठराव क्र.३२ दिनांक ३०/१२/२०१७.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार प्रस्ताव की, संदर्भ क्र.१ अन्वये "महानगरपालिकेच्या वतीने कायम विना अनुदान तत्वावर एक माध्यमिक शाळा (वर्ग) प्रायोगीक तत्वावर सुरु करणेस मान्यता दिलेली होती." व सदरच्या खर्चाबाबत मा.शासनाचे विशेष अर्थ सहाय्य उपलब्ध होणेसाठी पाठपुरावा करण्यात यावा असा ठराव पारीत झालेला होता.

तथापि सदरच्या माध्यमिक विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजुरी मिळणेसाठी मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावाबाबत सदरची बाब धोरणात्मक असल्याने मा.स्थायी समितीने संदर्भ क्र.२ अन्वये मा.महासभेकडे प्रस्ताव पाठविण्यात यावा. असा निर्णय दिला. त्यानुसार संदर्भ क्र.३ अन्वये मा.महासभेपुढे सादर झालेल्या प्रस्तावाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे सविस्तर माहितीसह फेर सादर करण्यात यावा असा ठराव पारीत झाला.

तरी सदर प्रस्तावाबाबत पुढील उचित कार्यवाही होण्याच्या दृष्टीने प्रस्ताव पुनःश्च मा.महासभेपुढे पाठविणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे चर्चा करीता पाठवावे.

यावर मा.महापौर मॅडम यांचा अभिप्राय की, नगरसचिव.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १५** **दिनांक : ०२ /११/२०१८.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव कार्यालयाजवळील चाहुराणा बु. ४६/१ पैकी मोकळी जागा श्री संत सावता आश्रम शिक्षण समिती, माळीवाडा या संस्थेस शैक्षणिक वापरासाठी भाडे तत्वावर जागा देणे बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ -: १) श्री.बाळासाहेब मारुतीराव बोराटे, चेअरमन, संत सावता आश्रम शिक्षण समिती, माळीवाडा, अहमदनगर यांचा दिनांक ३०/०८/२०१७ रोजीचा अर्ज.

२) राजश्री छत्रपती शाहु शिक्षण प्रसारक मंडळ, बुरुडगांव रोड यांचा दिनांक ०५/०९/२०१७ रोजीचा हरकत अर्ज.

३) मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले,नगरसेवक,महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचा दिनांक ०६/०९/२०१७ रोजीचा हरकत अर्ज.

४) राजश्री छत्रपती शाहु शिक्षण प्रसारक मंडळ, बुरुडगांव रोड यांचा दिनांक ०२/०७/२०१८ रोजीचा हरकत अर्ज.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने अहवाल खाली प्रमाणे सादर करीत आहे. :-

१) विषयांकित चाहुराणा बु.स.नं.४६/१ क्षेत्र ८२ आर ही जागा अहमदनगर शहराच्या मंजुर विकास योजनेच्या नकाशात विद्यमान प्राथमिक शाळा या वापरासाठी दर्शविलेली आहे. सध्या सदर जागेपैकी काही क्षेत्रावर महानगरपालिकेची विद्यमान शाळा व प्रभाग समिती क्र.४ चे विभागीय कार्यालय आहे. व उर्वरीत २४ आर जागेत एका बाजुस जुनी व्यायामशाळेचे बांधकाम असुन ते पडिक अवस्थेत आहे. व उर्वरीत जागा रिकामी असुन सदर जागेचा परिसरातील नागरीक गैरवापर करीत आहेत. तसेच सदर जागेस जुनी संरक्षक भिंत असुन काही ठिकाणी तिची पडझड झालेली आहे.

२) सदर जागेच्या सात-बारा उता-यावर जिल्हा परिषदेचे नाव नजरचुकीने लागलेले होते. ते दुरुस्त करुन सात-बारा उता-यावर अहमदनगर महानगरपालिकेचे नाव नुकतेच लागलेले आहे.

३) संत सावता आश्रम शिक्षण समिती, माळीवाडा, अहमदनगर यांनी विषयांकित चाहुराणा बु. स.नं.४६/१ या जागेपैकी २४ आर जागा शैक्षणिक वापरासाठी भाडे तत्वावर मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

४) तथापि सदर शाळेपासुन जवळ असलेल्या (.२०० मीटर अंतरावर) राजर्षी श्री.छत्रपती शाहु शिक्षण प्रसारक मंडळाच्या जिजामाता विद्यालय, यांनी संदर्भीय अर्जान्वये सदर जागा शाळेसाठी अर्जदार संस्थेस न देणे बाबत तक्रार अर्ज दिलेला आहे. तसच सदरभागातील मा.नगरसेवक श्री.गणेश भोसले यांनी देखिल सदर जागा अर्जदार संस्थेस देणे बाबत विरोध दर्शविलेला आहे. व अर्जात सदर संस्थेने भाडेतत्वावर घेतलेल्या इतर म.न.पाच्या जागेचे भाडे भरलेले नसल्याबाबत नमुद केलेले आहे. व सदर जागेचा वापर शाळेच्या खेळाच्या मैदानासाठी करावा अशी मागणी केलेली आहे.

सदर संस्थेने भाडेतत्वावर घेतलेल्या इतर म.न.पाच्या जागेचे भाड्याबाबत मार्केट विभागाकडुन माहिती घेतली असता मार्केट विभागाने त्याच्या कडील पत्र क्र.१८४ दिनांक ३१/०७/२०१८ अन्वये सदर संस्थेकडे ३१ मार्च २०१८ अखेर थकबाकी निरंक असले बाबत कळविलेले आहे.

सबब अहमदनगर शहराच्या मंजुर विकास योजनेत सदर जागा ही विद्यमान शाळेसाठी दर्शविलेली असल्याने व विद्यमान शाळे व्यतिरिक्त जागा क्षेत्र २४ आर ही जमिन सध्या पडीक आहे. व सदर जागेचा

परिसरातील नागरीक गैरवापर करीत असल्याने, सदर जागा क्षेत्र २४ आर ही जागा अर्जदार शैक्षणिक संस्था यांच्या मागणी अर्जानुसार शैक्षणिक वापरासाठी भाडे तत्वावर देणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे पुढील निर्णयासाठी सादर करणे योग्य होईल.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर मॅडम यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १६** **दिनांक : ०२ /११/२०१८.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना दिवाळी सनानिमित्त बोनस व सानुग्रह अनुदान मिळणे बाबत... (**संपाची नोटीसा बाबत.**)

संदर्भ : १) अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा.क्र.१९/श्रमिक / २०१८ दिनांक १७/०७/२०१८ रोजीची संप नोटीस.

२) मा. सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडील दि. १७/७/२०१८ चे सुनावणी बाबतचे पत्र.

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये की, सरचिटणीस, अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचेकडील जा.क्र.१९ / श्रमिक / २०१८ दिनांक १७/०७/२०१८ अन्वये औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २२ (१) नुसार संप नोटीस देऊन परिशिष्टातील मागण्यासाठी अहमदनगर महन्गरपालिकेतील सर्व कामगार दिनांक ०१/०८/२०१८ पासुन किंवा त्यानंतर संपावर जातील असे नमुद करुन संप नोटीसमध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये खालील प्रमाणे मागण्या केलेल्या आहेत.

**१) दि. ०७/११/२०१८ रोजी दिवाळी सण असल्याने महानगरपालिकेतील सर्व कामगारांना सन २०१७-१८ या सालासाठी त्यांच्या सर्व भत्यासह होणा-या वार्षिक मिळकतीच्या २०% बोनस म्हणुन दिवाळी सणापुर्वी अदा करण्यात यावा.**

**२) महानगरपालिकेतील सर्व कामगारांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदानापोटी रक्कम रु. २०,०००/- (अक्षरी रु.वीस हजार मात्र) दिवाळीपुर्वी विनाअट देण्यात यावी.**

तसेच अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचे दिनांक १७/०७/२०१८ रोजीच्या संप नोटीसाच्या अनुषंगाने मा. सहाय्यक कामगार आयुक्त,अहमदनगर यांनी त्यांचेकडील जा.नं. एसीएल / आयडीए/ पीयुएस/ १९७५/२०१८ दि.१७/०७/२०१८ अन्वये विषयांकित बाबत दि. २७/०७/२०१८ रोजी सकाळी ११ :०० वाजता आवश्यक त्या कागदपत्रासह सुनावणीस उपस्थित राहणे बाबत सुचित केलेले आहे.

यापुर्वी अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचे दि. ०३ / ०८ / २०१७ रोजीच्या संप नोटीसाच्या अनुषंगाने सन २०१६-२०१७ करीता दिवाळी सणानिमित्त महानगरपालिकेमधील कर्मचा-यांच्या सानुग्रह अनुदाना बाबत कामगार युनियन व प्रशासन यांची संयुक्त बैठका वेळोवेळी झालेल्या होत्या. तथापि याबाबत निर्णय न झाल्याने कामगारांनी दिवाळी सणावेळी अचानक काम बंद आदोलना केल्याने त्यावेळेस मा. पदाधिकारी, प्रशासन व कामगार युनियन यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात येवुन त्यामध्ये करारनामा करण्यात येवुन कामगारांना प्रत्येकी रु. ६,०००/- इतका सानुग्रह अनुदान देणे बाबत निर्णय झालेला होता. त्यानुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना प्रत्येकी रु. ६,०००/- इतका दिवाळी सानुग्रह अनुदान देण्यात येवून त्याकामी रु. १,१९,८३,०००/- इतका खर्च झालेला होता. त्यानुषंगाने मा. महासभेची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावास मा. महासभा ठराव क्रं. ३० दि. ३०/१२/२०१७ अन्वये ठराव पारीत करुन कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे.

संदर्भिय क्रमांक १ च्या कामगार युनियन यांचे दिनांक १७ / ०७ / २०१८ रोजीच्या संप नोटीसाच्या अनुषंगाने उक्त संप नोटीसामधील मागण्यांबाबतचा सदरचा विषय आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाची बाब असल्याने त्याकामी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेणे संयुक्तिक होईल.

तसेच अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१८ - २०१९ च्या अंदाजपत्रकातील लेखाशिर्षक अनु. क्रं. ४१ मध्ये कर्मचारी सानुग्रह अनुदान करीता रु. १.५० कोटी इतकी आर्थिक तरतुद प्रस्तावित केलेली आहे.

तरी कामगार युनियन यांनी दिलेले पत्र व संप नोटीसाचा विचार करता कामगार युनियन प्रतिनिधी यांच्याशी समक्ष चर्चा विनियम करणे उचित वाटत असल्याने त्याकामी दिनांक व वेळ मिळणेस व तसे कळविणेस मान्यता असावी. प्रस्ताव मान्य झाल्यास सोबतच्या पत्रावर स्वाक्षरी करीता सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मु.ले.अ. व मु.ले.प. यांचा अभिप्रायासह फेर सादर करावे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, दिनांक २७/०८/२०१८ रोजीच्या बैठकीनुसार प्रस्ताव फेरसादर करण्यांत यावा.

यावर मा.मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मा.मुख्यलेखाधिकारी यांचे अभिप्रायाप्रमाणे विभागाने स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव फेरसादर करण्यांत यावा. Pcqing अपूर्ण आहे. Conciliation officer. Industrial Disputs Act १९४७ Ahmednagar यांचे पत्र क्र. १९७५ दिनांक १७/०७/२०१८ प्रमाणे कामगार विभाग/आस्थापना विभागाने काय कार्यवाही केली याचा टिप्पणीत उल्लेख नाही. पूर्ततासह ठेवावे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुलेप यांच्या अभिप्रायानुसार कामगार विभागाचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर कामगार अधिकारी, यांचेकडुन सादर की, मा.समेट अधिकारी यांचे दिनांक १७/०७/२०१८ चे पत्रानुसार कुठलिही कार्यवाही कामगार विभागामार्फत करण्यांत आलेली नाही. येणेप्रमाणे अभिप्राय असे.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मु.ले.प यांच्या अभिप्रायानुसार आस्थापना विभागाने काय कार्यवाही केली या बाबत टिप्पणीमध्ये उल्लेख करावा.

दि.१०/०९/२०१८

यावर आस्थापना विभागाकडुन दिनांक १०/०९/२०१८ रोजी फेरसादर रिपोर्ट की,

उपरोक्त विषयान्वये की, मा. मुख्यलेखाधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणावरील शेरांकनानुसार सानुग्रह अनुदान प्रकरणांचे संपुर्ण पान क्रमांक नमुद केलेले असुन मनपा कामगार युनियन यांचे संदर्भिय संप नोटीसाच्या अनुषंगाने मा. सहाय्यक कामगार आयुक्त, अहमदनगर यांचेकडे दि. २७/०७/२०१८ रोजी सुनावणी घेण्यात आलेली असुन सदर सुनावणी बैठकीस मनपा कामगार युनियन प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळेस मनपा प्रशासनाकडून प्रस्तुत विषय मागणी बाबत मनपा कामगार युनियन व मनपा प्रशासन यांचेमध्ये चर्चा विनियम करणेसाठी संयुक्त बैठक आयोजित करण्यात येईल याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

त्यानुषंगाने मनपा कामगार युनियन व मनपा प्रशासन यांचेमध्ये दि. ०४/०८/२०१८ रोजी व दि. १३/०८/२०१८ रोजी संयुक्त बैठका आयोजित करण्यात आलेल्या होत्या. सदर संयुक्त बैठकीमध्ये चर्चा विनियम होवुन निर्णय न झाल्याने याबाबत पुनश्चः दि. २७/०८/२०१८ रोजी संयुक्त बैठक आयोजित करण्यात येवुन त्यामध्ये अंदाजपत्रकामध्ये सानुग्रह अनुदानाबाबत केलेल्या लेखाशिर्षातील तरतुदीनुसार मनपामधील पात्र कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देण्यास शिफारस करण्यात येत असलेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. (**सोबत : सदर बैठकीचे इतिवृत्त.**)

तरी प्रस्तुत प्रकरणी आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुलेअ, मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, मनपा कामगार युनियन आणि प्रशासन यांचेमध्ये दिनांक २७/०८/२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त अनु.क्र.७ अन्वये मा.आयुक्तांकडे आदेशार्थ सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, लेखापरिक्षण विभाग उपायुक्त यांच्या नियंत्रणाखाली काम करु शकते का ? याबाबत अधिनियमास्थित तरतुदीचा अभ्यास करुन व उपायुक्त यांनी स्वतःचे अभिप्राय नोंदवूनच लेखापरिक्षण विभागास सादर करावे. अन्यथा सदर प्रकरणावर लेखा परिक्षकांकडून अभिप्राय दिले जाणार नाही. याची नोंद घ्यावी. याबाबत वारंवार सुचना करुन त्यात बदल होत नसल्याने नाईलाजास्तव पुर्व लेखा परिक्षण बंद करुन पोष्ट ऑडीट सुरु करण्यात येईल याची दखल घेण्यात यावी.

तसचे महाराष्ट्र मनपा (सुधारीत) अधिनियम २०११ चे कलम ४७ व भारतीय लेखा व लेखापरिक्षण विभाग, महालेखापाल, मुंबई यांचा अहवाल सन २००७ परिच्छेद क्र.४.३.१ नुसार मुख्यलेखापरिक्षक व आयुक्त ही दोन स्वतंत्र कार्यकारी पदे असून उक्त तरतुदीनुसार वरिष्ठ दर्जाच्या व स्वतंत्र अस्तित्व असणा-या अधिका-यांस कनिष्ठ दर्जाच्या अधिका-याने अभिप्राय देण्याबाबत प्रशासनिक दृष्टया संयुक्त ठरत नाही.

उपरोक्त नमुद शासन निर्णय, अधिनियम, तरतुदी विचारात घेता तसेच महाराष्ट्र मनपा (सुधारीत) अधिनियम २०११ मधील क्र.४७ च्या तरतुदीनुसार संवैधानिक पदाचे कर्तव्ये विचारात घेवुन आस्थापना शाखेमार्फत याबाबत उचित निर्देश व्हावेत.

(१) दिनांक २७/०८/२०१८ च्या इतिवृत्तावर मुलेप यांची दिनांक ३०/०८/२०१८ रोजी स्वाक्षरी केली असुन सदरची इतिवृत्तांचा प्रस्ताव १० तारखेला सादर करुन उपायुक्त (सा) यांनी २७/९/१८ ला स्वाक्षरी करुन पुढे मु.ले.अ.कडे सादर केली असून मुलेअ यांनी ३/१०/१८ रोजी स्वाक्षरी करुन दि.४/१०/१८ रोजी मुख्य लेखापरिक्षकांकडे सादर केलेली दिसून येते. प्र.सहा.आयुक्त (आस्था) व उपायुक्त (सा) यांनी सदर टिपण्णी उशीराने सादर करण्याचे प्रयोजन काय हे दिसून येत नाही. याबाबत उशिरा सादर करण्याच्या प्रयोजनाबाबत जबाबदारी निश्चित करणे योग्य राहील.

(२) प्रस्तावात टिपण्णी मधील पृष्ठ क्र.१८९,१९० वरील दि.१३/८/१८ रोजीचे बैठकीचे इतिवृत्त मधील मुलेपचे अभिप्राय अवलोकन करावे. तसेच पृष्ठ क्र.२१५ मधील यापुर्वी सानुग्रह अनुदानाचा तपशिल सादर केला असून त्याचे अवलोकन करुन प्रस्तावित दिनांक २७/०८/२०१८ चे इतिवृत्त बाबत मनपाची आर्थिक स्थिती विचारात घेवून मा.आयुक्त यांनी सानुग्रह अनुदान देणेबाबत उचित निर्णय घेता येईल.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पृष्ठ क्रमांक २१३ व २१४ वरील इतिवृत्तानुसार आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, यांचा अभिप्राय की, मा.महासभेची मंजूरी घेणे योग्य राहील.

यावर मा.महापौर मॅडम, यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : **शुक्रवार दिनांक ०२/११/२०१८ रोजी** सकाळी ११.०० वाजता होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या विशेष सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची विशेष सभा **शुक्रवार दिनांक ०२/११/२०१८ रोजी** सकाळी ११.०० वाजता **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.